SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 0 9 1 1 दि. 24 FEB 2026

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- विद्यार्थ्याचा महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रवेशित दिनांक मिळणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र.ससंइमाबकको/आधार व स्वयंम योजना स्मरणपत्र-१ अत्यंत तातडीचे/२०२५-२६/३७१, दि.१८/०२/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर यांच्या प्राप्त ई-मेल नुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांमार्फत वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागस वर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील (धनगर समाजाचे वगळून) जातीच्या मुला-मुलींना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु केली आहे तसेच (abobckolhapur@gmail.com) या ई-मेल वर विद्यार्थ्यांचे अर्ज पाठविण्यात यावेत व सोबत पत्र जोडलेले आहे.

तसेच विद्यार्थी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये
उपकुलसचिव
संलग्नता टी - २ विभाग

सोबत - पत्र जोडले आहे.

E:\Nil\Parit Sir\Circular 2025.docx

महाराष्ट्र शासन
सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर.
E-mail:-adobckolhapur@gmail.com

जा.क्र.ससंइमाबकको/आधार व स्वयंम योजना **स्मरणपत्र-१ अत्यंत तातडीचे**/२०२५-२६/३७१ दि.:-१८/०२/२०२६.

**प्रति,**

मा. प्राचार्य,

१.डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,साळुंखेनगर जि.कोल्हापूर.

२.डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलजी,कसबा बावडा कोल्हापूर.

३.शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४.सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंग कोल्हापूर.

५.कै.केदारी रेडेकर आर्युवेदिक महाविद्यालय कोल्हापूर.

६.स्वामी विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

७.महावीर कॉलेज कोल्हापूर.

८.एस.जे.पी.इ.एस होमिओपॅथिका मेडिकल कॉलेज कोल्हापूर.

९.रियाजभाई शमनजी कॉलेज ऑफ फार्मसी गडहिंग्लज कोल्हापूर.

**विषय :- विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रवेशित दिनांक मिळणेबाबत...**

संदर्भ :- १.इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक वगृयो/२०२०/प्र.क्र.११/योजना-५ दि.१३/१२/२०२३.

२.इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र.वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५ दि.११.०३.२०२४

३.इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र.स्वयंम-२०२३/प्र.क्र.३६८/योजना-२ दि.२१.०६.२०२४.

४.या कार्यालयाचे पत्र क्र.२८८ दिनांक:-०९/०२/२०२६.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये शासन निर्णयानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांमार्फत वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना **"पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना"** व विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागास वर्ग, आणि विशेष मागास प्रवर्गातील (धनगर समाजाचे वगळून) जातीच्या मुला-मुलींना **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना"** सुरू केली आहे.

त्यानुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी या कार्यालयास अर्ज सादर केले आहे.महाविद्यालयांचे नाव व विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी विद्यार्थी संख्या | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,साळुंखेनगर जि.कोल्हापूर. | ११ | ०२ |
| २. | डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलजी,कसबा बावडा कोल्हापूर. | ३८ | १४ |
| ३. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २४ | ६ |
| ४. | सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंग कोल्हापूर. | १४ | ३ |
| ५. | कै.केदारी रेडेकर आर्युवेदिक महाविद्यालय कोल्हापूर. | ६ | ० |
| ६. | स्वामी विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. | ६ | १ |
| ७. | महावीर कॉलेज कोल्हापूर | २ | ० |
| ८. | एस.जे.पी.इ.एस होमिओपॅथिका मेडिकल कॉलेज कोल्हापूर. | १ | ० |
| ९. | रियाजभाई शमनजी कॉलेज ऑफ फार्मसी गडहिंग्लज कोल्हापूर. | ० | १ |

तरी वरीलप्रमाणे सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्षाच्या १० महिन्यांसाठी दिला जातो. तरी आपल्या महाविद्यालयाचे प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष हे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी सध्या शिकत असलेले वर्ष हे कधी सुरू झाले आहे व कधीपर्यंत संपणार आहे याबाबतची माहिती सोबतच्या पात्र यादीमधील रकाना क्र. १५ व १६ मध्ये भरुन त्वरित या कार्यालयास पाठवण्याबाबत आपणास यापुर्वी संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची माहिती अप्राप्त आहे. सद्यस्थितीत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेकरीता प्रस्तूत कार्यालयास निधी प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर माहिती दि. २३/०२/२०२६ पर्यत प्रस्तूत कार्यालयास (abobckolhapur@gmail.com) या ईमेल वर पाठवावी सदर माहिती प्राप्त न झाल्यामुळे विद्यार्थी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची राहिल याची गांभीर्याने नोंद घ्यावी. .

**सोबत :-** पात्र विद्यार्थ्यांची यादी व प्रपत्र

(अमित घवले)
**इतर मागास बहुजन कल्याण,**
**अधिकारी गट-ब कोल्हापूर.**